| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २४.०८.२०१७ |
| नोंदविल्याचा दिनांक | : | २४.०८.२०१७ |
| निकाल दिनांक | : | ०५.०५.२०२६ |
| कालावधी | : | ०८व.०८म.१२दि. |

**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पाथर्डी, न्यायालय क्र.१, यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी – रविकिरण सपाटे)

**नियमित फौजदारी खटला क्र. २००/२०१७**

**निशाणी क्रमांक – ३६**

गुन्हा नोंद क्र.३७६/२०१७, पाथर्डी पोलीस ठाणे, पाथर्डी,

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र शासन,**
मार्फत – पोलीस निरीक्षक,
पाथर्डी पोलीस ठाणे, पाथर्डी.

प्रतिनिधीत्व : सहाय्यक सरकारी वकील श्रीमती. ए. बी. कुलकर्णी.

**आरोपी**

१. **मनोज मारुती वाळके,**
वय – २७ वर्ष, धंदा –शेती,

२. **अनिल नाना वाळके,**
वय – ५३ वर्ष, धंदा –शेती,

३. **मारुती नाना वाळके,**
वय – ५६ वर्ष, धंदा –शेती,

४. **भाऊसाहेब नाना वाळके,**
वय – ६५ वर्ष, धंदा –शेती,

सर्व रा. माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

प्रतिनिधीत्व : विधीज्ञ श्री. आर. एन. खेडकर.

## भाग–ब

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १८.०६.२०१७. |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १८.०६.२०१७. |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २४.०८.२०१७. |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | ०२.०३.२०२६ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :– | १७.०३.२०२६. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०५.०५.२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | –– |

## आरोपींची माहिती

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनोज मारुती वाळके | समज दिली | ०२.०३. २०२६ | भा.दं.वि. कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | अनिल नाना वाळके | | | | | | |
| ३. | मारुती नाना वाळके | १८.०६. २०१७ | १९.०६. २०१७ | | | | |
| ४. | भाऊसाहेब नाना वाळके | समज दिली | ०२.०३. २०२६ | | | | |

## न्यायनिर्णय

## (पारित दिनांक ०५ मे, २०२६)

१. आरोपीविरुध्द पाथर्डी पोलीस ठाणे गु.र.नं.३७६/२०१७, भारतीय दंड

विधान संहिता, १८६० चे कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह ३४ खालील गुन्हयांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिताचे प्रकरण १९ अन्वये वॉरंट खटल्याप्रमाणे संपरिक्षा घेण्यात आली.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीगत अशी की**,

फिर्यादी पिडीता (तिचे नाव निष्पण होवू नये म्हणून पिडीता संबोधण्यात येते) यांनी दि.१८.०६.२०१७ रोजी पोलिस स्टेशन पाथर्डी येथे फिर्याद दिली की, दि.१८.०६.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास फिर्यादीचे पती गावात जात असतांना त्यांच्या घराजवळ आरोपी क्र.३ आला व पुर्वी झालेल्या भांडणाचे कारणावरुन त्यांना शिवीगाळ व दमदाटी केली. फिर्यादी व तिचे पती त्यांना समजावुन सांगण्यास गेले असता त्याचा राग आल्याने सर्व आरोपींनी त्यांना शिवीगाळ करुन फिर्यादीच्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र.३ ने फिर्यादीचा ब्लाऊज व साडी ओढुन तिचा विनयभंग केला व आरोपी क्र.२ ने तिला तुझी इज्जत ठेवणार नाही, माझी मंत्र्यांपर्यंत ओळख आहे, मी तुमचा एक एकाचा काटा काढीन अशी धमकी दिली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन पाथर्डी पोलीस ठाणे गु. र. क्र. ३७६/२०१७ भा. दं. स. कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह ३४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो. हे. कॉ. बी. बी. भोसले यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ पंचनामा तयार केला आणि तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी आरोपींविरुध्द नि.२१ कडे दोषारोप ठेवला आहे. दोषारोपातील मजकुर आरोपींना त्याच्या भाषेत वाचून दाखविला असता, आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षा घेण्याची मागणी केली.

५. तसेच, आरोपींचे फौजदारी व्यवहार संहिता, १९७३, कलम ३१३(१) (ब) चे निवेदन आरोपींविरुध्द गुन्ह्यात सहभाग असल्याइतपत पुरावा मिळुन न

आल्यामुळे नोंदविण्यात आले नाही.

६. खटला निर्णित करणेसाठी माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.१८.०६.२०17 रोजी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास मौजे माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी येथे फिर्यादीच्या घरी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीचा ब्लाऊज व साडी ओढुन तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का? | नाही. |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व तिच्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ३. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीच्या व तिच्या पतीच्या हातुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा एखादा फौजदारीपात्र गुन्हा घडावा या उद्देशाने तिला शिवीगाळ करुन अपमानित केले, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ४. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व तिचे पतीला जिवे मारण्याची धमकी दिली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## – का र ण मि मां सा –:

**मुद्दे क्र. १ ते ४ करीता –**

७. वरील चारही मुद्दे एकमेकांशी सलंग्न असल्याने विवेचन व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विश्लेषण एकत्रीत करण्यात येत आहे.

८. सा.क्र.१ फिर्यादी हिने सरतपासात घटना साधारण सात ते आठ वर्षापुर्वी माळीबाभुळगाव येथे घडल्याचे सांगते. आरोपींसोबत शेतातील बांधाच्या कारणावरुन त्यांची किरकोळ भांडणे झाली होती. तिने दि.१८.०६.२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजण्याचे सुमारास आरोपी मनोज याने किरकोळ भांडणाच्या कारणावरुन दमदाटी केली, ती व तिचे पती त्यांना समजावुन सांगत असताना आरोपीने तिला व तिच्या पतीला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच, आरोपी मारुती यांनी तिचा ब्लाऊज व साडी ओढुन तिचा विनयभंग केला त्यावेळी आरोपी अनिल याने तुझी इज्जत ठेवणार नाही माझी मंत्र्यांपर्यंत ओळख आहे, मी तुमचा एक एकेकाचा काटा काढीन अशी धमकी दिल्याबाबत स्पष्टपणे नाकारले आहे. तिने फिर्याद दिल्याचे मान्य केले परंतु, त्यातील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. तिने फिर्यादवरील फक्त तिची सही नि. ३२ ओळखली.

९. सा.क्र.२ याने त्याच्या सरतपासात घटना साधारण सात ते आठ वर्षापुर्वी माळीबाभुळगाव येथे घडल्याचे सांगतो. आरोपींसोबत शेतातील बांधाच्या कारणावरुन त्यांची किरकोळ भांडणे झाली होती. त्यानंतर त्याच्या पत्नीने रागा रागाने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली होती. त्याने दि.१८.०६.२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजण्याचे सुमारास आरोपी मनोज याने किरकोळ भांडणाच्या कारणावरुन दमदाटी केली, ते व त्याची पत्नी त्यांना समजावुन सांगत असताना आरोपीने त्याच्या पत्नीला व त्याला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच, आरोपी मारुती यांनी त्याच्या पत्नीचा ब्लाऊज व साडी ओढुन तिचा विनयभंग केला त्यावेळी आरोपी अनिल याने तुझी इज्जत ठेवणार नाही माझी मंत्र्यांपर्यंत ओळख आहे, मी तुमचा एक एकेकाचा काटा काढीन अशी धमकी दिल्याबाबत त्याने स्पष्टपणे नाकारले आहे.

१०. सदर फिर्यादी व साक्षीदार हे अभियोग पक्षास पूरक साक्ष देत नसल्याने सहा.सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोग पक्षास पुरक असा कोणताही पुरावा पटलावरती आणता आलेला नाही. फिर्यादी यांनी त्यांची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झाली असून आरोपींविरूध्द काही तक्रार नसल्याचे मान्य केले आहे.

११. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा नि.३४ मान्य केल्याने घटनास्थळ फिर्यादीच्या घराजवळ असल्याचे शाबीत होते. परंतु, पटलावरती आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला व तिच्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण केली, तसेच तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले, तिला शिवीगाळ करुन अपमानित करुन तिच्या हातुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा फौजदारी पात्र गुन्हा घडावा या उद्देशाने शिवीगाळ केली, तसेच तिला जिवे मारण्याची धमकी दिली याबाबत कोणताही पुरावा आला नसल्याने रास्तपणे आरोपींनी गुन्हा केला असे म्हणता येणार नाही. त्यामूळे मी मुद्दे क्र. १ ते ४ यांचे निष्कर्ष नकरार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता–</u>**

१२. माझे वरील विवेचनावरुन तसेच मुद्दे क्र.१ ते ४ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला असल्याने अभियोग पक्ष आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये निश्चित केलेले दोषारोप सर्व संशयाच्या पलीकडे जावून शाबीत करण्यास अपयशी ठरले आहे. अशा परिस्थितीत आरोपींना संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त करणे योग्य व उचित होईल. करीता मी मुद्दा क्र. ५ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र. १ ते ४ यांची भारतीय दंड संहिता कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षेस पात्र गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा स्वतंत्र जामीन सादर करावा. सदरचे बंधपत्र हे पुढील सहा महिन्यांकरता वैध राहिल.

**(निकाल खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)**

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.05.05 16:32:21 +0530

दिनांक – ०५/०५/२०२६ **(रविकिरण सपाटे)**
पाथर्डी. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१ पाथर्डी.

## भाग–क

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | पिडीता ( तिचे नाव निष्पण होवू नये म्हणून पिडीता संबोधण्यात येते) | फिर्यादी | निशाणी ३१ |
| २. | विकास सोनाजी वाळके | साक्षीदार | निशाणी ३३ |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी ३२/साक्षीदार क्र.१ | फिर्याद वरील सही |
| २. | निशाणी ३४ /आरोपीतर्फे मान्य | घटनास्थळ पंचनामा |

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.05.05 16:32:25 +0530

दिनांक – ०५/०५/२०२६ **(रविकिरण सपाटे)**

पाथर्डी. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.१ पाथर्डी.

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करते की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | रोहिणी आमटे, |
| न्यायालयाचे नाव | : | रविकिरण सपाटे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. १, पाथर्डी, जि. अहमदनगर. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०५/०५/२०२६ |